# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**जाहीरात**

(कंत्राटी पध्दतीने पदभरणेसाठी)

ठाणे महानगरपालिका अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाकडे "माहिती व जनसंपर्क अधिकारी" या पदाकरिता जा.क्र.ठामपा/पिआरओ/उपआ(मु)-१६८६/२१-२२, दि.११/०२/२०२२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र उमेदवारांचा समावेश करुन स्पर्धा मुलाखतीसाठी अधिक उमेदवार प्राप्त करुन घेण्यासाठी सहा महिन्याच्या कालावधीकरीता करार पध्दतीने ठोक एकत्रित मानधनावर पात्र व इच्छुक उमेदवारांकडुन अर्ज ठाणे महानगरपालिका ठाणे, मुख्य आस्थापना विभाग, प्रशासकीय भवन, चंदनवाडी, पाचपाखाडी, ठाणे यांचेकडे दि. २३/०३/२०२२ ते दि. ०४/०४/२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेपर्यंत मागविण्यात येत आहेत. अर्जाच्या लिफाफ्यावर कंत्राटी पध्दतीने मानधनतत्वावर अर्ज असे ठळक अक्षरांत नमूद करावे. अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला व त्यावर रु.५/- चे पोस्ट मुंद्राक चिकटवेल्या १५ सें.मी x १० सें.मी. आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

| अ. क्र. | पदनाम | एकत्रित मानधन | एकुण जागा | पात्रतेचा निकष |
|---|---|---|---|---|
| १. | माहिती व जनसंपर्क अधिकारी | रु.७०,०००/- | ०१ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>२) पत्रकारिता व जनसंज्ञापन (Journalism & Mass Communication) मधील पदविका आवश्यक.<br>३) शासकीय / निमशासकीय / नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेतील उप माहिती व जनसंपर्क या पदावरील ३ वर्षाचा अनुभव.<br>४) अ श्रेणी बृतपत्रात काम केल्याचा किमान १५ वर्षाचा अनुभव. |

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१. उमेदवारांनी अर्जामध्ये नमूद केलेले वय, शैक्षणिक अर्हता व अनुभव या अनुषंगाने असलेल्या दाखल्यांच्या स्वसाक्षांकित प्रती (Self Attested Xerox Copies) अर्जासोबत स्कॅन करुन सादर करावे तसेच सदरच्या स्वसाक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्रांसह मुलाखतीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२. उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी नमुद करावा.

३. सदरची पदे निव्वळ सहा महिन्याच्या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने घेण्यात येणार असून पदाचा कार्यकाळ सहा महिन्याचा असेल.

४. वयोमर्यादा : उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५. जा. क्र. ठामपा / पिआरओ/उपआ(मु)-१६८६/२१-२२, दि.११/०२/२०२२ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि.१४/०२/२०२२ ते दि.२३/०२/२०२२ या कालावधीत ठाणे महानगरपालिकेकडे ज्या इच्छुक उमेदवारांनी उपरोक्त कालावधीमध्ये अर्ज केले आहेत त्यांनी पुन:श्च नव्याने अर्ज दाखल करु नयेत याची नोंद द्यावी.

Sd/-

महापालिका आयुक्त

ठाणे महानगरपालिका, ठाणे